

आरतीपुष्पमाला

(नव्या विविध आरत्या)



डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

उपासनेसाठी नित्यपाठ

आरतीपुष्पमाला

(डॉ. सुहास पेठे तथा पेठेकाका यांनी
लिहिलेल्या आरत्या)
(ऑडिओ सीडीसह)

डॉ. सुहास पेठे

*** आरतीपुष्पमाला ***

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : ऑगस्ट २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

प्रास्ताविक

कृतज्ञता आणि प्रार्थना यांच्या अभिव्यक्तीसाठी नित्योपासनेत साधन म्हणून आरतीला महत्त्वाचं स्थान आहे. संतछाया हॉल व संतनगरी परिसरात होणाऱ्या आरत्यांना श्री पेठेकाकांनी वेगळं भावपूर्ण आणि प्रभावी परिमाण दिलं आहे. त्यांची वैशिष्ट्यं अशी की, या आरत्या, त्यांच्या अनेक चाली तर नव्या आहेतच पण त्या पारंपारिकपणे देवांच्या, संतांच्या, ग्रंथांच्या बरोबरच त्यात 'नामा'सारख्या साधनाचीही आरती आहे. 'देव' या मूळ संकल्पनेची आरतीही आहे, साऱ्या आयुष्याचा अनुभव देऊन आपल्याला अंतर्मुख करणाऱ्या विश्वात्मकाची आरतीही आहे आणि सर्व धर्मपथांना एकत्र आणणाऱ्या 'गुरुपदा'ची आरतीही आहे. या आरत्या नुसत्या म्हणण्याच्या नाहीत, तर अर्थपूर्ण, अनुभवानं समृद्ध, भावानं-आर्ततेनं भरलेल्या असल्यानं आम्हाला त्यांचा साधन म्हणून जसा उपयोग होतो आहे, तसा तो इतरांना होत राहो, यासाठी या पुस्तिकेबरोबरच त्यांची ऑडिओ सीडीही प्रकाशित होत आहे.

संतकृपेचा हा प्रसाद सर्वांच्या साधनेला पूरक ठरो, ही ईश्वरचरणी प्रार्थना !

- नंदन पेठे
साधक परिवारांच्या वतीने

संगीत,गायन,हार्मोनियम : डॉ. सुहास पेठे
तबला, झांज, ध्वनिमुद्रण व संपादन : संतनगरी परिवार

- आरत्यांची प्रातिनिधिक वैशिष्ट्यं -

(१) उपासनेत गरजेनुसार समावेश.
(२) अर्थ आणि भाव यांना प्राधान्य देण्यासाठी काही सोप्या नव्या चाली.
(३) साधनेचा मूळ हेतू साध्य करण्यासाठी कुणी विशिष्ट व्यक्तीनंच करण्याची आवश्यकता नसणं, त्याची विशिष्टच वेळ नसणं, तेल, तूप, वाती अशा उपाधी सकारण टाळणं, अनेकदा कापूर -आरती करणं किंवा वेळी भावाच्या अभिव्यक्तीसाठी ती नुसती म्हणणं - असे पर्याय.
(४) एकूण आरती या उपासनेला पूरक असलेल्या साधनाची व्यापकता आणि निरुपाधिकता वर्धमान राहाव्यात, यासाठी इथं जाणीवपूर्वक नम्र प्रयत्न केले जातात.

***

आरतीपुष्पमाला : अनुक्रमणिका

१. देवांची

२. नामाची

३. सृष्टीची

४. जलदेवतांची

५. विश्वात्मकाची

६. गुरुपदाची

७. संतांची

८. गाईची

९. श्री हरिपाठाची

१०. श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची

११. श्री सद्गुरुलीलामृताची

१२. श्री अन्नपूर्णेची

१३. श्री देवीची

१४. श्री गणपतीची

१५. श्री शंकराची

१६. श्री काळभैरवाची

१७. श्री हनुमन्ताची

१८. श्री रामाची

१९. श्री दत्तगुरूंची

२०. श्री विष्णूची

२१. श्री पांडुरंगाची

२२. श्री कृष्णाची

२३. श्री ज्ञानेश्वरांची

२४. श्री तुकोबांची

२५. श्री समर्थ रामदास स्वामींची

२६. श्री महाराजांची

२७. श्री माणिकप्रभूंची

२८. श्री गुरुदेवांची

२९. प्रेमनिधी संत सीतामाईंची

३०. श्री स्वामी निरंजन रघुनाथ यांची

३१. श्री कृष्णदास महाराजांची

३२. वास्तुपुरुषाची
३३. साईबाबांची
३४. श्री गजानन महाराजांची
३५. श्री ब्रह्मानंदांची
३६. श्री सिद्धारूढस्वामींची
३७. श्री स्वामी समर्थांची
३८. श्री मामासाहेबांची
३९. श्री रमण महर्षींची
४०. श्री निसर्गदत्त महाराजांची
४१. श्री पंतांची
४२. श्रद्धेची
४३. स्वामी वरदानंदांची
४४. श्री तात्यासाहेब केतकर महाराजांची
४५. श्री विश्वनाथ महाराजांची
४६. श्री बाबा महाराजांची आरती
४७. श्री भावगीतेची आरती
४८. देवांची भूपाळी
४९. देवांची शेजारती
५०. श्री शंकर महाराजांची
५१. श्री नानामहाराज तराणेकर यांची
५२. रामभक्त साध्वी अंबिकाबाई यांची
५३. श्री ज्ञानेश्वरीची आरती
५४. श्री श्रीकृष्णसरस्वतींची
५५. सूर्यनारायणाची
५६. श्री कलावती आईंची
५७. श्री बीडकर महाराजांची
५८. श्री ब्रह्मानंद (पुष्कर) यांची
५९. चंद्राची आरती
६०. श्री तुकामाईंची
६१. श्री वासुदेव कृष्णाची
६२. श्री टेंब्येस्वामींची
६३. श्री योगी अरविंदांची
६४. श्री निंबरगी महाराजांची
६५. श्री रामकृष्ण परमहंस यांची
६६. श्री माऊसाहेब उमदीकर यांची
६७. श्री विनोबांची
६८. श्री गणोरे बाबांची
६९. श्री जे. कृष्णमूर्तींची
७०. श्री स्वामी स्वरूपानंदांची

१. देवांची आरती

देवांची आरती, लाविल्या भावांच्या ज्योती।।धृ।।

अरूप तुम्ही, निर्गुण तुम्ही विश्वाचे आधार ।
शिवरूपे राहुनी पहाता शक्तीचा व्यवहार ।
मायामय या दीन जीवांना कशी कळे महती।।१।।

म्हणुनी बनवुनि मूर्ती आम्ही आवाहन केले ।
विविध रुपाने तुम्ही येउनी घर पावन केले ।
कर्तव्यांत सदा घर राहो मन चरणांवरती ।।२।।

---

२. नामाची आरती

गाऊ नामाची आरती । ज्याने देव दिला हाती ।। धृ ।।
आहत तैसे अनाहताचे । शब्दरूप हे बीज जगाचे ।।
देत स्मरण चित्ती ।।१।।
नव्हे अक्षरे, मंत्र नसे हे । सगुणरूप भगवंत असे हे ।।
सद्ध, संत वरिती ।।२।।
निरुपाधिक मार्गांचा राजा । कुणाच्याहि हे येई काजा ।।
येथ भेद मिटती ।।३।।
असो कुणाही देवरुपाचे । उन्मन करिते घेई त्याचे ।।
भक्त दीन तरती ।।४।।

३. सृष्टीची आरती

सृष्टीमाय तुजला आम्ही ओवाळू आरती ।
तुजला ओवाळू आरती।
संदेशांचे चिंतन घडण्या देई शुद्ध मती।।धृ।।

सूक्ष्मरूप तो देव तुझ्यातुन प्रगटे या जगती ।
वाटे प्रगटे या जगती ।
पर्वत झाडे वेली पुष्पे मनोगते गाती ।।
रुजोत त्यातिल अधोरेखिते जनीमनीचित्ती ।
अमुच्या जनीमनीचित्ती ।
संदेशांचे चिंतन घडण्या देई शुद्ध मती ।।१।।

निसर्ग तू तो, तूच प्रकृती एकरूप होशी ।
अवघे एकरूप होशी ।
तुजला कळते वळते ते ते कळु दे आम्हांसी।।
संवादातुन बोध घेउनी होऊ दे प्रगती।
आमुची होऊ दे प्रगती।
संदेशांचे चिंतन घडण्या देई शुद्ध मती।।२।।

---

४. जलदेवतांची आरती

जय गंगे जय कृष्णे, जय भागीरथी ।
तृषार्त तृप्त करिता जगातले अतिथी ।। धृ ।।
जयदेव जयदेव...

पंचतत्त्वे जीव आकारा आले ।
पृथ्वी अग्नी वायू तृष्णे व्याकुळले ।
प्रसन्न जलतत्त्वाने जीवन दिधले ।
तुमच्या रूपे प्रकटुनि सर्वा उद्धरिले ।। १ ।।
जयदेव जयदेव...

जीवनगंगा तुम्ही आम्हा हे कळु दे ।
कृपाचिंतने शुद्ध चित्त होऊ दे ।
कृतज्ञतेने जीवन पावन जगू दे ।
दीनभक्ता नित्य भान हे टिकु दे ।। २ ।।
जयदेव जयदेव...

५. विश्वात्मकाची आरती

विश्वात्मका तुजला देवा ओवाळू आरती ।
तुझ्या कृपेचा सदैव होवो बोधपाठ चित्ती ।।धृ।।

(१)
जन्मोजन्मी प्रपंच करुनी भागलो आता ।
माझे माझे भरुनी ओंजळ मोकळी आता ।।१।।
नातीगोती मानमान्यता पैसा पोकळ ।
स्वार्थी जगती कुणी न भेटे निखळ प्रेमळ ।।२।।
कल्पनेतले मिळण्यासाठी आजवरी श्रमलो ।
ज्याची त्याची कास धरूनी दूर किती गेलो ।।३।।
चैतन्यात्मक तुझीच होती प्रेमळ संगती ।
भान तिचे मज आले आता नित्य टिको चित्ती ।।४।।

(२)
निसर्गातले रूप अचेतन तसे सचेतन ।
कधी थबकलो नाही घेण्या तुमचे दर्शन ।।१।।
सुष्टदुष्ट वा क्षुद्रभव्य वा ऐलपैल भासो ।
तुजला प्रिय कण विश्वामधला कुणी कुणा त्रासो।।२।।
सर्वांचे हित नित्य घडावे हेतू तव ठायी ।
समग्रतेचे भान मला दे कृतीत अन् हृदयी ।।३।।
तुझे,तुझ्यास्तव,तव इच्छेने जगेन जीवन ।
दीन जिवांना तुझे घडू दे सदैव दर्शन ।।४।।

६. गुरुपदाची आरती

जय देव जय देव जय श्री गुरुपदा ।
अनंतरूपे प्रकटुनि उद्धरिशी जगता ।।धृ।।

चार खाणींमध्ये जीव जन्मले ।
वासनायोगाने इहलोकी भ्रमले ।
स्वस्वरुपा विसरोनी देहमय झाले ।
जिज्ञासारूपाने तू जागृत केले ।।१।। जयदेव..

कोठुनि आला जीव ओळख तू देशी ।
जगी जगावे कैसे ते तू बोधीशी ।
कोठे जाणे जीवा ध्येय दावीशी ।
सार्थक जीवनाचे साधुनिया देशी ।।२।। जयदेव..

जेथे अडला जीव सावरण्या येशी ।
हाक देती आर्त तू प्रकट होशी ।
धर्म ना, पंथ ना, भेद ठेवीशी ।
छत्र आभाळापरि सर्वांवरि धरिशी ।।३।। जयदेव..

संत सत्पुरुष अन् अगणित अवतार ।
आजहि नाना रूपे घेशी आकार ।
वर्णन करण्या देवा तुमचे उपकार ।
दीना पडते अपुरे शब्दभांडार ।।४।। जयदेव..

७. संतांची आरती

गाऊ संतांची आरती । देव जागा करिती चित्ती ।।धृ।।

निर्गुण दुर्लभ देव झाला । त्यांनी सगुणात आणिला ।।१।।
स्वार्थी जीव जो गुंतला । त्याला परमार्थी लाविला ।।२।।

खोटा कर्ता जो तो झाला । कोण कर्ता तो दाविला ।।३।।
प्रारब्धाची पुसली रेखा । यत्न देव हा ओळखा ।।४।।

मिथ्या अशुद्ध देव गेले । शुद्ध देवांसी स्थापिले ।।५।।
सद्‌गुण स्वप्नीचे वाटले । त्यांनी जगुनीया दाविले ।।६।।

लोकांसम हे जगती आले । मात्र मृत्यू पुसुनी गेले ।।७।।
सूक्ष्म रूपात राहिले । प्रमाण आजहि देती भले ।।८।।

अपार बुद्धीचे सागर । केला सूक्ष्माचा व्यवहार ।।९।।
सोने मातीत दाखविती । मीपण सरता हाती देती ।।१०।।

पैसा भपका केला दूर । साधेपणावरी भर ।।११।।
प्रेम निःस्वार्थाचे भजन । अवघे त्यागाचे जीवन ।।१२।।

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।१३।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।१४।।

८. गाईची आरती

धेनू गंगामाई । आरति देवत्वाचे आई ।। धृ ।।

पशूकुलातिल पावित्र्याचा तू आविष्कार ।
सात्त्विकता, करुणा, प्रेमाचा तू जणु अवतार ।
देवहि करिती वसतीसाठी तुझा अंगिकार ।।१।।

समजुत, शांती येवो माई अम्हा तुझ्यातील ।
भाव जाणवो अम्हा पामरा तव नयनांतील ।
तव सेवेने दीनजिवांना लाभो गोपाल ।।२।।

---

९. श्री हरिपाठाची आरती

आरती हरिपाठा । झाल्या सोप्या भक्तिवाटा ।।
आरती हरिपाठा ।।धृ।।

सत्तावीस सुमनांची । कल्याणार्थ माळ झाली ।
ज्ञानदेवे कृपा केली । भक्तां नित्यसंध्या झाली ।।१।।

हरिपाठ संकीर्तन । देवकीर्तीचे गायन ।
मुखे हरि उच्चारण । थोर घडते साधन ।।२।।

नाम हाचि दिव्य मार्ग । सुखे घरा येई स्वर्ग ।
द्वैत, भेद होई त्याग । सर्व विष्णुमय जग ।।३।।

जीवनाचे सार वाटिले । गूढ तत्त्व सोपे केले ।
दीन जीव धन्य झाले । हरिनामे उद्धरले ।।४।।

१०.श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आरती

जय जय ज्ञानेश्वरी नवव्या अध्याया ।
देशी मार्ग सर्वा देव मिळवाया ।। जय देव जय देव ।।धृ।।

अठरा अध्यायांत गीतार्थ आला ।
नवव्यामध्ये देव सर्वांचा झाला ।
सामान्यांचे प्रेमहि आहे देवाला ।
पापी अज्ञ जीवा आश्वासन झाला ।।१।। जय देव..

ज्ञान भक्ती योग संन्यास आले ।
आदर राखुनि वेदा स्थान दाविले ।
सोपे नाम, कीर्तन महिमे गाईले ।
कर्ममार्गे कैसे चालावे भले ।।२।। जय देव...

देवाला आवडे फळफूलपान ।
पाणी चाले, श्रेष्ठ भाव त्याहून ।
वडीलकीला लागे भक्तीचे ज्ञान ।
माऊलींचे जीवन त्याला प्रमाण ।।३।। जय देव...

देव अकर्ता हा काय विचार ।
विपरित ज्ञान, भक्ती त्याज्य प्रकार ।
कोण्या रीती खरा देव मिळणार ।
रहस्य कळुनी दीना आनंद फार ।।४।। जय देव...

११. श्री सद्‌गुरुलीलामृताची आरती

सद्‌गुरुलीलामृत ग्रंथा जय आद्यचरित्रा हो ।
जय जय आद्यचरित्रा हो ।।
चरित वर्णिशी, बोध घडविशी,
ओवीरूपे बोध घडविशी ।
दीन साधकां हो ।।धृ।।

गोंदवल्याचे सगुण ब्रह्म तेरा श्लोकांत ।
नमिले तेरा श्लोकांत ।।
ब्रह्मानंदा आनंदित करि । शिष्यवृंदा आनंदित करि ।
पवित्र श्रीचरित ।।१।।

गुरुइच्छेने तेराऽध्यायी चरित्रविस्तार ।
प्रकटे चरित्रविस्तार ।।
गोपाळांची सद्‌गुरुसेवा । श्रवणी पठणी उद्धरि सेवा ।
ठेवा हा अमर ।।२।।

नरदेहाचे सार्थक करण्या दिला सुगम मार्ग ।
आम्हा दिला सुगम मार्ग ।।
नामे प्रेमे साध्य करावा । दाविशि कैसा साध्य करावा ।
इहलोकी स्वर्ग ।।३।।

१२.श्री अन्नपूर्णेची आरती

आरती जय अन्नपूर्णे तुझिया पायाशी ।
अहर्निशी तू कृपाप्रसादे जग सांभाळीशी ।। धृ ।।

जडचेतन जग चालविणे हा तुझा सहज धर्म।
फळे पालवी अन्नधान्य हे तुझे कृपा वर्म ।।
देउन, सेवू तुझ्या प्रसादा मनी धरू मर्म ।
करोत अवघे तृप्त प्राण, वैश्वानर नित कर्म ।। १ ।।

जे जे बनवू अन्न चतुर्विध तुझ्या मंदिरी या ।
कृपा तुझी त्यामध्ये राहु दे सात्त्विकता द्याया ।।
अंतर शुद्ध करो सर्वांचे साधन वाढाया ।
दीन जीव होवोत मुक्त ही विनंति तव पाया ।। २ ।।

---

१३. श्री देवीची आरती

जगज्जननि हे जय जय माते, भावारति घेई ।
कृतज्ञतेने तव गुण गाण्या, मती अम्हा देई ।।धृ।।

कृपे शिवाच्या शक्तिरूप तव, अतर्क्य अवतार ।
तूच निर्मिशी या जगताला, तुझाच आधार ।
जगी रजावर तसा तमावर, तुझाच अधिकार ।
सत्त्व संकटी पडता करिशी, तमरज संहार ।।१।।

अंबा, दुर्गा, अन्नपूर्णा, तुळजामाता तूच ।
तू योगेश्वरी, तूच रेणुका, जोगेश्वरी तूच ।
काली, शाकंबरी, वैष्णवी, गौरी, लक्ष्मी तूच ।
अनेक रूपे अवतरशी तू, घरि आई तूच ।।२।।

अधिक्षेप तव कुठेहि न घडो, अमुच्या हातून ।
ठायी ठायी तुला पहाण्या, दे मंगल नयन ।
देव भेटण्या मार्ग तूच दे, माया भेदून ।
दीन जिवांची हीच विनंती, चरणा लागून ।।३।।

---

१४. श्री गणपतीची आरती

जय जय आरती, जय गुणगणपति,
मंगलमयचरणा ।। धृ ।।

प्रदीर्घ श्रवणा, विशाल नयना ।
विराट मस्तक, उदंड ज्ञाना ।
अपूर्व संयमना ! ।।१।।

दे सद्‌बुद्धी, शुद्ध भावना ।
प्रामाणिकता देई जीवना ।
दीना कलितरणा ! ।।२।।

---

१५. श्री शंकराची आरती

शंकरा, जय शंकरा ।। धृ ।।

शांत वसशी निबिड रानी ।
मौनमुनि कैलास बनुनी ।
हिंस्रता, विष तू पचवुनी ।
तारीशी अभयंकरा ।।१।।
नृत्य तव हे विश्व सारे ।
मृत्युतांडव हेहि तू रे ।
भक्त भोळे दीन तव रे ।
उद्धरी करुणाकरा ।।२।।

---

१६. श्री काळभैरवाची आरती

हे स्वयंभु शंभुशिवा, काळभैरवा, काळभैरवा..
जय जय काळभैरवा ।।धृ।।

ब्रह्मा जे निर्मितसे ।
विष्णू प्रतिपाळितसे ।
विलया तुज अर्पितसे ।
देउनि त्या उत्तम गति, जन्म दे नवा ।।१।।
काळभैरवा, जयजय..

सत्याची कास धरिति ।
रजकर्मा शुद्धि देति ।
जे तमास दूर करिति।
रक्षण दे सत्कार्या, आणि त्या जिवां ।।२।।
काळभैरवा, जयजय..

येता दुर्भाव कुठुन ।
करि त्यांचे निर्दालन ।
भक्तांवरि छत्र धरुन।
दीन जना अभय देई, जिंकण्या भवा ।।३।।
काळभैरवा, जयजय..

१७. श्री हनुमन्ताची आरती

जय जय हनुमन्ता, ओवाळू ...
जय धीमन्ता, जय रामवन्ता ! ...।।धृ।। जय जय..

साध्यसाधका, अतुल सेवका ।
निःस्वार्थाच्या पथप्रदर्शका ।
कपिवर कुलवन्ता ! ...।।१।।
ओवाळू जय जय हनुमन्ता...

मायावी वा दुष्ट अतिरथी ।
तुझिया पुढती कुणीही न टिकती ।
वायुतत्त्ववन्ता ! ...।।२।।
ओवाळू जय जय हनुमन्ता...

देई शक्ती, सेवा, शुद्धी ।
नामामध्ये दीना दृढमती ।
तारी कृपावन्ता ! ...।।३।।
ओवाळू जय जय हनुमन्ता...

१८. श्री रामाची आरती

आरती गुणरूप रामा, निर्गुणविश्रामा ।।धृ।।

काळ कलीचा दुर्धर आम्हांवरती हा आला ।
जीवजीव भयभीत विकारांपुढती हा झाला ।
दे तव शक्ती दासा दीना जपण्या सद्धर्मा ।
सद्‌बुद्धीच्या अंतर्ज्योती लावियल्या धामा ।।१।।

किती युगे अन् कितीक नामे घेशी अवतार ।
तुला आणण्या आम्हाजवळी तप नाही थोर ।
परि ये सगुणी, ना तरि येई नामी रे रामा ।
पाही आशा धरुनी आम्ही घेत तुझ्या नामा ।।२।।

१९. श्री दत्तगुरूंची आरती

जय देवा जय देवा जय श्री गुरुदत्ता ।
करुणामय, जय निश्चल, निर्मल अवधूता ।।धृ।।

आसक्तीच्या त्यागे जिंकिति संसारी ।
अवस्थात्रयत्रिगुणांचे स्वामित्व करी ।
नाथ समर्थ महानुभाव वारकरी ।
धर्मपंथातीत दत्त कृपा करी ।।१।।
जय देवा जय देवा जय श्री गुरुदत्ता ।

जे जे 'दत्त' आम्हा परमेशे दिधले ।
उद्धाराचे त्यातच गुह्य असे दडले ।
अपुल्या अवतारे ते सकळ कळो आले ।
दत्तप्रभूंनी असंख्य दीन उद्धरिले ।।२।।
जय देवा जय देवा जय श्री गुरुदत्ता ।

---

२०. श्री विष्णूची आरती

ओवाळूया जय नारायण विष्णु परब्रह्मा ।
जय जय विष्णु परब्रह्मा ।।

सहस्रज्योती उजळू गाऊ अगाध तव महिमा ।
देवा अगाध तव महिमा ।।धृ।।

अनंत वर्षे अगणित रूपे निर्मियली सृष्टी ।
देवा निर्मियली सृष्टी ।।
संकल्पाचा खेळ तुझा हा दिपवी जनदृष्टी ।
देवा दिपवी जनदृष्टी ।।१।।

जगड्व्याळ हा व्याप न कळतो अतर्क्य तव लीला ।
देवा अतर्क्य तव लीला ।।
कार्यकारणे जीवन घटना चक्रे चालविला ।
देवा चक्रे चालविला ।।२।।

थोर व्यास ते सहस्र नामे अपूर्व तव गाती ।
देवा अपूर्व तव गाती ।।
किती वर्णिले तरी पलिकडे तू व्यापुन उरशी ।
देवा तू व्यापुन उरशी ।।३।।

(कृपया पुढे पहा)

तूच ब्रह्म तू संहारक तू, पालक तू होशी ।
देवा पालक तू होशी ।।
स्मरण-चिंतने दीनभक्त हे बंधमुक्त करिशी ।
देवा बंधमुक्त करिशी ।।४।।

---

२१. श्री पांडुरंगाची आरती

जय पांडुरंगा विठ्ठला सखया ।
ओवाळु स्मरुनी वत्सला सदया ।।धृ।।

ही ओढ कुठुनि तू लावियली भक्तीची ।
हे भाग्य उजळले जाग दिली देवाची ।
माळावर कलिच्या बाग तुझी सत्याची ।
या अभक्त जगती रक्षण भक्तां देशी ।।१।।

ये अपात्र कुणि वा पात्र तुझ्या पायाशी ।
तू दर्शनमात्रे, स्मरणे पावन करिशी ।
जे प्रेमळ, दुर्लभ संत हृदयि तू धरिशी ।
दे अपात्र दीना थारा तव पायाशी ।।२।।

---

२२. श्री कृष्णाची आरती

परमात्मस्वरूपा, जगत्सख्या श्रीकृष्णा ।
अवतारा पूर्णा, हरि रे मम भवतृष्णा ।।धृ।।

पेंद्यावरती जे, प्रेम सुदाम्या तेच ।
जो राधेचा तू , रुक्मिणिचा तू तोच ।।
उद्धवा-अर्जुना, भीष्मसखाही तूच ।
देवकी-यशोदा, परि तो नंदन तूच ।।१।।

त्या गाई-गोपी, कुब्जा असुनी दूर ।
तव लळा लागतो, ये यमुनेला पूर ।।
तव प्रतीक्षेत ते, शत्रु कंस-चाणूर ।
भक्तांच्या हृदयी, नित बासरिचे सूर ।।२।।

तुजपासुन आम्ही, कर्म शिकू की ज्ञान ।
की शस्त्रसज्जता, युद्धनीतिविज्ञान ।।
उद्धारशास्त्र की, गीतामृत, निर्वाण ।
दीनास आपुले, भक्तीचे दे भान ! ।।३।।

---

२३. श्री ज्ञानेश्वरांची आरती

जय देव जय देव श्री ज्ञानेश्वर ।
योग्यांची माउली, भक्तांची सावली, देव साकार ।।
जय देव जय देव ।।धृ।।

भक्तीचा कैलास, ज्ञानसागर ।
ज्ञानेश्वर माझा प्रेमपाखर ।
ज्याला त्याला वाटे अपुला आधार ।
नाही झाली असली माउली थोर ।।१।।

जाणत असुनी गीता वेदार्थ सगळा ।
वंचित जीवांसाठी जीव कळवळला ।
ज्ञान सोपे करुनी अनुभवही दिधला ।
पसायदाने जीव शांत हा केला ।।२।।

धाक वेदज्ञांना, पाखंडी जना ।
अव्यक्ताची सत्ता दावी सर्वांना ।
देवमार्गी कोणी मोठा ना साना ।
दिंडीने विठ्ठल भेटे सर्वांना ।।३।।

साहुनी दुःख, बोल अज्ञ जीवांचे ।
हरिपाठे कल्याण केले सर्वांचे ।
ज्ञानेश्वरी अमृत अपुल्या भाषेचे ।
भाग्य दीना कळु दे काय हे अमुचे ।।४।।

२४. श्री तुकोबांची आरती

ओवाळूया श्री तुकोबांना । जय, जय तनमनपावना ।
देवभक्तांच्या जीवना । आम्हा भक्तांच्या जीवना ।।धृ।।

जगजनात राहूनी । अवघे विपरीत साहूनी ।
संसाराची मजुरी करुनी । जोडियेले भक्तीधना ।
जोडियेले विठ्ठलधना ।।१।।

मद भ्रम केले दूर । भेद पाखंडा प्रहार ।
कोठे व्हावे कृपण, उदार । हाती दिले मर्मज्ञाना ।
हाती दिले ब्रह्मज्ञाना ।।२।।

साधकाची जपुनी दशा । कशी टाकावी ती आशा ।
मान कैसा अव्हेरावा । डोळा घातले अंजना ।
जगा लावीले भजना ।।३।।

दावियेले स्वहित कशात । साधनांची काय मात ।
दीनां गाथा हे अमृत । गाठी कैसे नर, नारायणा ।
याच जन्मी नारायणा ।।४।।

२५. श्री समर्थ रामदास स्वामींची आरती

जय श्री रामदासा समर्था सदया ।
सज्जनगडनिवासा राममय हृदया ।।धृ।।

कल्याणाचे चिंतन बालपणी केले ।
त्याच्या ध्यासे माया प्रपंच त्यागियले ।
घोर तपाने राघव सगुणी प्रगटविले ।
जगदोद्धारासाठी सर्वस्वा दिधले ।।१।।
जय श्री रामदासा समर्था सदया ।

पिंजुनि काढुनि जागृत देश हा केला ।
स्वधर्म जगण्या अवघा जन प्रेरित केला ।
स्वास्थ्याच्या शिवस्वप्ना आकार दिधला ।
कार्याने वनभुवना आनंद झाला ।।२।।
जय श्री रामदासा समर्था सदया ।

दासांसाठी बोध अक्षरमय केला ।
आत्मारामी 'राम' शब्दी आणियला ।
हरेक श्लोक मनाचा मंत्र हा झाला ।
दीन भक्तां मार्ग करुणाष्टक दिधला ।।३।।
जय श्री रामदासा समर्था सदया ।

२६. श्री महाराजांची आरती

जयदेवा, गुरुदेवा ब्रह्मचैतन्या ।
मायबाप आपण आम्हां अनन्यां ।।
जयदेव, जयदेव ।।धृ।।

हरिभक्तीच्या वंशी जन्म साधियला ।
बालवयी अतिकष्टे सद्‌गुरु शोधियला ।।
साक्षात्कार तयांच्या पूर्णकृपे झाला ।
जानकिजीवन जीवनसांगाती बनला ।।
जयदेव, जयदेव ।।१।।

प्रापंचिक कित्येकां तैशा विरक्तां ।
नाम देउनि दुर्लभ राम दिला हाता ।।
ज्ञानप्रेम देई आजहि तव सत्ता ।
दीनभक्त धन्य सद्‌गुरुगुण गाता ।।
जयदेव, जयदेव ।।२।।

२७. श्री माणिकप्रभूंची आरती

प्रभु प्रेममूर्ती । राजयोगमूर्ती ।
करुया माणिकप्रभु आरती ।।
जय जय माणिकप्रभु आरती ।
जय जय माणिकप्रभु आरती ।। धृ ।।

दत्त जयांचे वाली ठरले ।
तप आचरुनी अभेद झाले ।।
साक्षात्कारे, ज्यांच्या ठायी दत्तप्रभु प्रगटती ।।१।।
करुया माणिकप्रभु आरती ।
जय जय माणिकप्रभु आरती ।।

सकलमतांचे आदर केले ।
आर्तांना जे जीवन झाले ।।
भक्तकार्यकल्पद्रुम आजहि दीनजिवां ठरती ।।२।।
करुया माणिकप्रभु आरती ।
जय जय माणिकप्रभु आरती ।।

२८. श्री गुरुदेवांची आरती

नेमकुळीच्या देवा, साधकप्राणविसावा ।
जय जय, आरती श्री गुरुदेवा ।। धृ ।।

निंबाळक्षेत्री शुद्ध झरा ।
निंबरगीहुनि येई घरा ।
प्रसन्न केले उमदीश्वरा ।
दिव्यनाममय ठेवा ।। १ ।। जय जय...

परमार्थाच्या कीर्तिध्वजा ।
झळकविले जगि 'निज' तेजा ।
दीन वांछिती चरणरजा ।
कृपेसाठी करू धावा ।। २ ।। जय जय...

---

२९. प्रेमनिधी संत सीतामाईंची आरती

सीतामाई आई गाऊ आरती ।
धन्य तुमची भक्ती वाटे या जगती ।।धृ।। जयदेव..

माहेर भक्तीचे धन्य कुळ वारे ।
बाळपण प्रेम-कष्टांचे सारे ।
पतिदेव श्रीराम कुळ गणोरे ।
त्यांच्या रूपे देव झाले सोयरे ।।१।। जयदेव..

बाबांसंगे देशभक्ती आचरिली ।
कष्टांची कावड प्रेमे वाहिली ।
बाबांना प्रेरणा देवाची झाली ।
पातिव्रत्ये साथ त्यातही दिधली ।।२।। जयदेव..

साक्षात्कारे धन्य बाबा जाहले ।
अध्यात्माचे धन आईंना दिधले ।
भक्तीव्रत तुम्ही पुढती चालविले ।
भक्तांना आदर्श जीवन झाले ।।३।। जयदेव..

आदर्शाची कीर्ती लेकरे गाती ।
कर्तव्य, नामाची प्रेरणा घेती ।
पंढरी भुकूम गाई आरती ।
तरण्या दीनभक्त चरणी लागती ।।४।। जयदेव..

३०. श्री स्वामी निरंजन रघुनाथ यांची आरती

आरती, स्वामी निरंजन रघुनाथा ।
भावे चरणी ठेविला माथा ।।धृ।।

संसारी असता सुखदुःखा अनुभवले ।
जनस्वभाव स्वार्थी, मायेला मन विटले ।
मग दत्तदर्शना प्राण पणा लावियले ।
तुकयांना स्मरुनी प्रस्थाना ठेवियले ।।१।।

रघुनाथ सद्गुरू प्रसन्न तुम्हा झाले ।
आशीर्वच तैसे कवित्व तुम्हा दिधले ।
तुम्हि प्राण अर्पिता दत्तप्रभू प्रगटले ।
गिरनारी जीवन धन्य आपुले झाले ।।२।।

वैराग्या जपुनी शिष्यांसाठी झटले ।
अनुभवा, अभंगा, ज्ञाना अक्षर केले ।
गुरुमार्ग, भक्तिच्या विपुल प्रसादा दिधले ।
स्वामींच्या स्मरणी दीन जीव उद्धरले ।।३।।

---

३१. श्री कृष्णदास महाराजांची आरती

जय देवा गुरुदेवा श्री कृष्णदासा ।
भक्तीविरक्तिसेवा अवघ्या आदर्शा ।।
जयदेव, जयदेव।।धृ।।

कोकणप्रांती शिक्षण बालवयी झाले ।
विद्यादानासाठी ग्राम त्यागीले ।
संत राजाराम सद्‌गुरु लाभले ।
साधन करुनी जीवन धन्य तव झाले ।।
जयदेव, जयदेव ।।१।।

विरक्त राहुनि ब्रह्मचर्य साधीले ।
'बाळेनरनारी' हे 'प्रेमे' सेवीले ।
भक्तीने निजराम प्रसन्न केले ।
चरणी ठेवा दीन भक्त आपुले ।।
जयदेव, जयदेव ।।२।।

३२. वास्तुपुरुषाची आरती

जय जय वास्तुपुरुषा, आरति आकाराधीशा ।
मंगलसमयी नमुनि वांछितो, तव शुभ आशीषा ।। धृ ।।

निराकार तो ईश प्रेममय, कधि हो साकार ।
ग्रहगोलादिक पृथ्वी आम्हासाठी अवतार ।
भूमिरूप त्या भगवंताला, करू नमस्कार ।
युगेयुगे जी धारण करिते, अगणित आकार ।। १ ।।

त्यामधली ही वास्तु आमुची, कृपा जिवांवर ।
ईशरूप त्यामधील तुम्ही, दीना आधार ।
वास्तुदेवता शक्तिरूप तव, वसो निरंतर ।
प्रसन्न राहो दिक्कालहि हे, सदा अम्हावर ।।२।।

३३. साईबाबांची आरती

आम्हा आर्तांच्या नाथा । चरणी ठेवुनिया माथा ।
ओवाळू आरती, साई शिर्डीच्या नाथा ।।धृ।।

आधी व्याधी असती दुःखे अपार या जगती ।
कर्मफळे ती समजुन जगण्या बळ बाबा देती ।
न्यायी ईश्वरी सत्ता । सबुरी आणुनिया चित्ता ।।१।। ओवाळू...

अहंपणा घालविला सांगुन मागण्यास भिक्षा ।
दाने, परोपकारे केली संचयास शिक्षा ।
मोजी कणकण हा घेता । देई अनेकपट दाता ।।२।। ओवाळू...

पशुपक्षी अन् झाडे माणुस ईश्वरमय आहे ।
माणुसकी हा एकच आता धर्म पुढे आहे ।
पाळण्या शक्ती दे भक्ता । दीना अवघ्या तू त्राता ।।३।। ओवाळू...

३४. श्री गजानन महाराजांची आरती

शेगावीच्या गजानना, जय गजानना ।
घेण्या आरति या सदना ।।धृ।।

अपूर्व तुम्ही योगिजन । स्वानंदी नित रममाण ।
देहा धरिता अवतरुन । भक्तांसाठी तळमळुन ।
हित करण्यासी कळवळुन ।।१।।

अन्नजलाचे महिमान । गेलो होतो विसरून ।
धनमदपैशाला भुलुन । गेलो देवा विसरून ।
आम्हा दिधले जाणवुन ।।२।।

दांभिक, स्वार्थी खडबडुन । जागे केले शिकवून ।
निजसामर्थ्या दाखवुन । सर्वांभूती देवपण ।
भक्तीचे लाभे वळण ।।३।।

कली पुन्हा ये भयंकर । भूल घालितो जगावर ।
देवाचा पाडी विसर । दीनजनांना अभयवर ।
देण्या या हो घरोघर ।।४।।

३५. श्री ब्रह्मानंदांची आरती

ओवाळू आरती गुरुवर ब्रह्मानंदांसी ।
आज्ञापालन, त्याग, विरक्ती, सेवाकार्यासी ।।धृ।।

बनशंकरिने प्राण वाचवुनि दिधले दर्शन ।
वेद, शास्त्र, वक्तृत्व, पुराणे झाला संपन्न ।
नश्वरतेने ईशप्राप्तिचे करुनि दिले स्मरण ।
मार्गदर्शना वेंकटापती झाले अवतीर्ण ।।१।।

म्हणती सद्गुरुविण ना गति रे, जा गुरुसी शरण ।
तेच पुन्हा श्री दत्तगुरूंनी करुनि दिले स्मरण ।
महाराज गुरु लाभताच तव सार्थक जीवन ।
उद्धरता नामाचे कळुनी आले महिमान ।।२।।

गुरुआज्ञेने पदव्या विद्या दिधल्या सोडून ।
नामासाठी जगला श्रींना प्रमाण मानून ।
ज्ञानोत्तर भक्ती अन् निष्ठा अनन्य ठेवून ।
ती निष्ठा दीनांस लाभु दे द्या इतुके दान ।।३।।

---

३६. श्री सिद्धारूढस्वामींची आरती

जय जय सिद्धारूढस्वामी, जय शिवअवतारा ।
नित्य, निरंजन, अभेद असुनी, आरति स्वीकारा ।।धृ।।

श्री शंभूंनी दुष्ट नाशिले, अवतरुनी बहुत ।
देवसज्जना रक्षण दिधले, त्या त्या काळात ।
या अवतारी नाश न करिता, पालटता चित्त ।
शांति धरूनी शुद्धबुद्धिचे, जन केले अमित ।।१।।

जिज्ञासूंना आत्मबोध अन्, भक्तांना नाम ।
शास्त्रश्रवण, सहवास देउनी, केले निष्काम ।
कुणास शिक्षा, प्रत्यय, दीक्षा, शिकवियले प्रेम ।
दीनांच्या हाकेस्तव येता, असुनि पूर्णब्रह्म ।।२।।

३७. श्री स्वामी समर्थांची आरती

जय जय स्वामी समर्थ तुम्हा, ओवाळू दत्ता ।
अक्कलकोटनिवासी गुरुवर, प्रसन्न व्हा भक्ता ।।धृ।।

वटवृक्षाची छाया भक्ता, अनन्यजीवा निर्भय करिता ।
स्वार्थ, अहंता उरू न देता, हित जपण्याकरिता ।।१।।

भक्त मनीचे नश्वर हरता, शाश्वत दीना अपार देता ।
अतर्क्य सत्तेने आम्हाला , तारुनि न्या आता ।।२।।

३८. श्री मामासाहेबांची आरती

दांडेकर कुलभूषण मामा, घ्यावे दंडवता ।
विठ्ठलपायी मन राहू दे, इतुके द्या भक्ता ।।धृ।।

जोगबुवांच्या निःस्पृहतेची प्रतिमूर्ती तुम्ही ।
व्यासंगाचा पाया दिधला भक्तीला तुम्ही ।।
ब्रह्मचर्य, वैराग्यामध्ये सूर्यासम होता ।
अज्ञ, शरण जीवांना शीतल चंद्रासम होता ।।१।।

पाश्चिमात्य ज्ञानाचा संगम पूर्वेशी केला ।
ढोंगिजनांना जरब बसवुनी, सात्त्विक मार्ग दिला ।।
विद्यार्थी अन् वारकऱ्यांचे नित आश्रयदाता ।
दीनजनांना प्रेरक जीवन शाश्वत जे आता ।।२।

३९. श्री रमण महर्षींची आरती

नमो नमस्ते श्री रमणाय, चित्घनस्वरूपाय ।
आत्मसंस्थिते, शीतलदृष्टि, मृदुतमवचनाय ।।धृ।।

ज्ञातुं आत्मस्वरूपं बाल्ये, सर्वस्वं त्यक्तं ।
देहमनोक्काय त्वया तप, आचरितं घोरं ।।
निजविचारणा कोहमस्मि इति, अविरत कृत ध्यानं ।
बंधमुक्तिमुल्लंघ्य प्राप्तवान्, स्थितिं स्थिरां सोहम् ।।१।।

अनुग्रहार्थे दर्शनभाषण, कृपादृष्टिपातः ।
आचरणार्थे प्रस्थानत्रयि, उपदेश प्राप्तः।।
दीनबालकः मुक्तिकांक्षिणः, शरणं तव आगतः।
प्रसीद रमण श्री भगवन् मे, तव चरणप्राप्तः ।।२।

४०. श्री निसर्गदत्त महाराजांची आरती

श्री अवधूता निसर्गदत्ता ओवाळूया रे ।।धृ।।

सिद्ध पंथ रामेश्वर सद्‌गुरु । स्वरुपबोधे शोध करिति सुरु ।
पैल पोचले जीवनतारु । स्वरूप होशी रे ।।१।।

कुठे भेद ना, ना अवडंबर । आपुले स्वरूप शोधा सत्वर ।
तळमळ, कृति हा मार्ग खरोखर । दावि प्रकाशा रे ।।२।।

कितिक देश-विदेशी आले । भ्रमलेले जन जागृत झाले ।
दीन-जिवांचे भाग्य उदेले । तव संवादे रे ।।३।।

४१. श्री पंतांची आरती

जय श्रीपंतपदी या प्रेमळ, ओवाळू आरती ।।
हे अवधूता नाही उपमा, श्रुती नेति वदती ।।धृ।।

ज्ञानमार्ग हा हाती दिधला, राहुनि संसारी ।।
बाळप्पांची ध्वजा उभविली, भजनभक्तमंदिरी ।।१।।

देवमार्ग निरपेक्ष बोधिला, भेद दूर करुनी ।।
दीनजिवांना निर्भय केले, शुद्ध देव दावुनी ।।२।

४२. श्रद्धेची आरती

श्रद्धेची आरती करूया निर्गुणसगुणाची ।
जाणीव देई जी सर्वांतील शुद्ध स्वरूपाची ।।धृ।।

मनबुद्धीला जाग देतसे । त्यांचे त्यांना स्थान देतसे ।
मर्यादांचे भान देतसे ।
ओळख देई आनंदाच्या विशाल जगताची ।।१।।

कसे, का, कुठे आपण आलो । मायेमध्ये रमून गेलो ।
दिव्यत्वाचा हेतु विसरलो ।
स्मरण देउनी ध्येय गाठण्या दिल्या प्रेरणेची ।।२।।

सार्थक होण्या नरजन्माचे ।देत जी दिशा,साह्य शक्तिचे ।
दीनजिवांना छत्र कृपेचे ।
श्रद्धा ती टिकुदेत, प्रार्थना, हीच आर्ततेची ।।३।।

४३. स्वामी वरदानंदांची आरती

स्वामी वरदानंदा सच्चित्गुणकंदा ।
गुरुनिष्ठे ओवाळू अनंत आनंदा ।।धृ।। जयदेव जयदेव..

अघटितजन्मा, कर्मा, कोठे ना उपमा ।
विद्या वैद्यक आत्मज्ञानी परिसीमा ।।१।। जयदेव जयदेव..

जे जे सद्गुण दिधले तवरूपे देवे ।
गुरुसेवा सत्कर्मे वाटित सद्भावे ।।२।। जयदेव जयदेव..

समाजकारण, भाषा मिती ना विषयांस ।
दाविशि ध्यासे कैसा करणे अभ्यास ।।३।। जयदेव जयदेव..

संसारासी स्थान, परमार्था मान ।
अध्यापन, उद्बोधन, जपुनी साधन ।।४।। जयदेव जयदेव..

पाखंडा प्रहार, भक्ता आदर ।
दीना द्यावे अप्पा, चरणी माहेर ।।५।। जयदेव जयदेव..

४४. श्री तात्यासाहेब केतकर महाराजांची आरती

जय जय जय आरती श्री गुरु तात्यांचे चरणी ।
अमित, आर्त जिज्ञासूंसाठी झिजे ब्रह्मवाणी ।। धृ.।।

शरणागतिचे अपूर्व वारस, त्यात शुद्ध चित्त ।
नाम असो, निर्वाह, विवाह, गुरुआज्ञा व्रत ।।
जसे जिथे नेतील सद्गुरू, जावे समवेत ।
तेचि तेचि हित, निष्ठा जगला अवघ्या जन्मात ।।१।।

'महाराज' या एकच विश्वी, झाला तादात्म्य ।
आत्मानुभवी कृपे जाहला, नसे बुद्धिगम्य ।।
दीनांठायी भावचि केवळ, नसे इतर गम्य ।
तरी, देवसोहळा तव कृपे लाभो अनुपम्य ।।२।।

४५. श्री विश्वनाथ महाराजांची आरती

नामनिष्ठ, गुरुनिष्ठ माउली, विश्वनाथ माउली ।
जय जय विश्वनाथ माउली ।।धृ।।

डव्ह्यात शेतीमजूरी केली । कष्ट करित प्रारब्धे सरली ।
सर्पदंश आपत्ती आली ।
अपमृत्यूचे निमित्त करूनी, नाथकृपा प्रकटली ।।१।।

श्री गुरुनंगेनाथ सावली । तीव्र तपाला छत्र लाभली ।
निष्ठा पुरती शुद्ध जाहली ।
तुकाराम गुरुकृपे जाहले, विश्वनाथ माउली ।।२।।

योगभक्ति शुद्धीस पाळुनी । दूर द्वैतदंभास सारुनी ।
खऱ्या भक्तिची ओळख घडवुनि ।
दीनजिवांना डव्हा पंढरी, भूवरती झाली ।।३।।

४६. श्री बाबा महाराजांची आरती

कृतज्ञभावे जयजय बाबा महाराजांना स्मरू ।
जगी असूनी अखंड ध्यानी निजजनकल्पतरू ।।धृ।।

बुद्धिकृपेने अपरा विद्या अर्थाजन झाले ।
सूक्ष्म जाणता तनमन तुमचे गुरुचरणी विरले ।।१।।

सूचक भाषा प्रेमळ बोली वेळी उग्र तुम्ही ।
दीन बालका कसे करूनी न्यावे निजधामी ।।२।।

---

४७. श्री भावगीतेची आरती

जय जय प्रेमळ भावगीते, जय भगवद्‌गीते । गीते, जय प्रेमळ गीते ।।
बोध सुगम दिधलास बुद्धि दे, आचरणा माते । माते आचरणा माते ।।धृ।।

ऐन प्रसंगी बुद्धि फिरते । मोह, अहंता कशी भुलविते ।
करुनि समर्थन, स्वतःच फसते ।
कृष्णसंगती सावध करुनी, भक्तांना तारिते ।।१।। भक्तांना तारिते..

कर्म, ज्ञान, संन्यास, योग वा । स्वधर्म अपुला जाणुन घ्यावा ।
रूढी, भ्रम बाजूला ठेवा ।
मग हृदयातिल आत्मशक्तिही, साह्याला येते ।।२।। साह्याला येते..

खरे सार ती अनन्यभक्ती । आज्ञापालन ही शरणागति ।
संशय, तर्क, विकल्पही जाती ।
पापपुण्य-भ्रम-भेद-बंधने, विलयाला जाती ।।३।। विलयाला जाती..

कृपा देववाणीची झाली । भाव मराठीतून बोलली ।
जगण्या सर्वां सुलभ जाहली ।
हे परमात्मन्, दीनांकडुनी, घ्यावी ही आरती ।।४।। घ्यावी ही आरती..

४८. देवांची भूपाळी

दर्शनकांक्षा धरुनी चित्ती, हाक देउया हळू ।
दीप मनाचे उजळुनि देवा, काकडा ओवाळू ।।
देवा काकडा ओवाळू ।।धृ।।

बालरूप तुम्ही, तुम्हीच माता, तुम्ही पिता, त्राता ।
असेल जर झाली विश्रांती, दर्शन द्या आता ।।१।।
देवा दर्शन द्या आता..

जागृत देवा नित्य निरंतर, तुम्हा न दिनरजनी ।
आशीर्वच द्या दीनभक्ता,राहो स्मरण मनी ।।२।।
तुमचे राहो स्मरण मनी..

४९. देवांची शेजारती

निर्गुण प्रेमळ सगुण ब्रह्म ते, आले अमुच्या घरी ।
घ्या शेजारती सगुण देव हो,भावमंचकावरी ।।
अमुच्या भावमंचकावरी ।।धृ।।

दिक्कालातील दिव्य पसारा ।
अतर्क्य जगती नित्य चालला ।
विश्वासाठी श्रमला देवा, निद्रा घ्या अंतरी ।।१।।
अमुच्या ...

अपराधी वा दोषगुणी वा ।
तारुनि नेले तुम्हीच देवा ।
क्षमा करूनी अता विसावा, घ्यावा दीनांतरी ।।२।।
अमुच्या ...

५०. श्री शंकर महाराजांची आरती

जय श्री शंकर महाराज शिव, धनकवडीवासी ।
दत्तगुरू श्री स्वामिसमर्था, सर्व तूचि होशी ।।धृ।। समर्था ...

अवतरशी तू अयोनिसंभव, देहवेष घेशी ।
देवभक्तकार्यांच्यासाठी, क्षणी आज येशी ।।१।। समर्था ...

अज्ञसुज्ञ उद्धरण्या सर्वां, सगुणरूप धरिशी ।
आत्मज्ञाने, गूढ वर्तने, ज्यास तसे देशी ।।२।। समर्था ...

स्थूलसूक्ष्म दिक्काल लीलया, ओलांडुन जाशी ।
आर्त प्रार्थना दीनजिवांची, राखी पायाशी ।।३।। समर्था ...

---

५१. श्री नानामहाराज तराणेकर यांची आरती

सद्‌भावे श्री गुरुनानांसी ओवाळू आरती ।
ज्ञानभक्तियोगाची उजळू सगुण प्रेममूर्ती ।।धृ।।
जयजय ओवाळू आरती..

संपादुन अकराव्या वर्षी वेदशास्त्र गहन ।
मग गुरुप्राप्तीसाठी केले तीव्र अनुष्ठान ।
टेंब्येस्वामी प्रकट जाहले तीव्र तपा पाहुन ।
मंत्र आणि उपदेशा देती तराण्यास येऊन ।।१।।

अंतर्योगी राहुनि धरिती बाह्य सौम्य भावा ।
सर्वांसाठी सुलभ मार्ग जो दत्त दत्त गावा ।
भेद न करिता सर्वां देता आज भक्तिमेवा ।
दीनजनांना चरणी नाना ठाव नित्य द्यावा ।।२।।

५२. रामभक्त साध्वी अंबिकाबाई यांची आरती

ओवाळू अंबिके जय जय रामहृदयवासी ।।
विठ्ठलास साकडे घालुनी भक्तिपंथ धरिसी ।।धृ।।

मुंबईत नियतीने नेले । संसारा थाटुनिया दिधले ।
दोन लेकरा पदरी दिधले । पंचविशित परि पती हरपले ।
आघाता सोशी ।।१।। ओवाळू अंबिके...

उभय कुळांचा आश्रय नुरला । पंढरिचा आधार गाठला ।
लेकुरांसवे प्रार्थित त्याला । सगुण घेउनी सवे विठ्ठला ।
आलिस गावासी ।।२।। ओवाळू अंबिके...

विठ्ठल घाली रामपाउली । देवधर्मशाळाही दिधली ।
नाम घेत कर्तव्ये केली । काया सेवेमधे झिजविली ।
अखंड उपवासी ।।३।। ओवाळू अंबिके...

वाचुन घेउन प्रवचन प्रतिदिन । दीनमनी बोधासी घटवुन ।
भक्तिवारसा अंती देउन । ध्यास मनी रामाचा घेउन ।
रामरूप होसी ।।४।। ओवाळू अंबिके...

५३. श्री ज्ञानेश्वरीची आरती

जय जय ज्ञानेश्वरी अवतरे नेवासे गावी ।
भावार्थाची दिव्य दीपिका गीतार्था फुलवी ।।धृ।।

उपनिषदांतिल शाश्वत जीवन । सूत्रे आचाराची पावन ।
बोध कृष्णवाणीतुन ऐकुन । धन्य होतसे योद्धा अर्जुन ।
देव माउलीरुपे येउन बोध सुगम दावी ।।१।।

दुर्लभ वाणी सामान्यांना । कल्याणाचा मार्ग कळेना ।
जाणे माउलि अज्ञ जिवांना । उलगडले त्या दिव्य ज्ञाना ।
दीन म्हणे ही मराठीतली कृपा नित्य ध्यावी ।।२।।

---

५४. श्री श्रीकृष्णसरस्वतींची आरती

जय श्रीकृष्णसरस्वति दत्ता, कोल्हापुरवासी ।
शिर्के सदनी वास करोनी, सर्वां उद्धरिसी ।।धृ।।

अश्रद्धा, संदेह नावडे, जातपात, मीपणा नावडे ।
शिक्षा, भिक्षा, खुबीने धडे, सुधारण्या देशी ।।१।।

कधी कृपेचा विसर न व्हावा, अभेदभावे देव भजावा ।
नाम घेत गुरु नित्य स्मरावा, बोधिशि दीनासी ।।२।।

---

५५. सूर्यनारायणाची आरती

जय जय करु आरती । हे सूर्यनारायणा ।।धृ।।

प्राचीप्रतीचीहि तू, अधऊर्ध्व हे सर्व तू ।।
स्थितिशील गतिशील तू, हे नित्यनारायणा ।।१।।

ती दीप्तितमकाल तू, ग्रहतारकाचंद्र तू ।।
जलभूमि हे वायु तू, हे अग्निनारायणा ।।२।।

हे जन्म हे मृत्यु तू, अखिलांस जीवन तू ।।
दीनांस गुरु, देव तू, हे आत्मनारायणा ।।३।।

---

५६. श्री कलावती आईंची आरती

ओवाळू कलावती माता । जय जय कलावती माता ।।धृ।।

संसाराचे रूप जाणिले । मायेसंगे दुःख ठेविले ।
नातीगोती, मुलां त्यागिले । हरि धरुनी चित्ता ।।१।।
ओवाळू...

विशीत अवघी येत विरक्ती । निंदेने कधि ढळे न शांती ।
तीव्र ओढिने सद्गुरुप्राप्ती । नामी एकाग्रता ।।२।। ओवाळू...

प्रयाण केले गुरुआज्ञेने । भक्तिमान जन होत कीर्तने ।
नास्तिक अगणित आस्तिक भजने । जपली निरपेक्षता
।।३।।ओवाळू...

बालांमध्ये भक्ति रुजविली । थोरांचीही वृत्ति बदलली ।
दीनजिवांना माय लाभली । शाश्वत ही सत्ता ।।४।।
ओवाळू...

५७. श्री बीडकर महाराजांची आरती

गुरुवर बीडकर, जयजय रामानंद धन्य ।
स्वामिसमर्थाविना जयांसी, दैवत ना अन्य ।।धृ।।

श्रम निग्रह अभ्यास करावा । उदंड यश संसारी मिळवा ।।
फोलपणा मग जाणुनि घ्यावा ।
प्रपंच टाकावा, जाणुनि प्रपंच टाकावा ।।१।।

भक्तीपुढती काही न जगति । सद्गुरुकृपया स्वानंदस्थिति ।।
नरजन्मी ही अंतिम प्राप्ती ।
ईश्वर मिळवावा, शाश्वत ईश्वर मिळवावा ।।२।

५८. श्री ब्रह्मानंद (पुष्कर) यांची आरती

जय गुरु ब्रह्मानंद स्वामी । दिव्य भजनप्रेमी ।
पुष्करतीर्थनिवासी स्वामी । दिव्य भजनप्रेमी ।
जयजय दिव्यभजनप्रेमी ।।धृ।।

ज्योतिर्मठसे दीक्षा पायी । ब्रह्मस्थिति आजीवन आयी ।
प्रतापनृप को मुक्ति दिलायी । शिष्यहृदयस्थित अंतर्यामी ।।१।।
दिव्यभजनप्रेमी, जयजय दिव्यभजनप्रेमी...

योगरसायन, ईश्वरदर्शन । नित्य आचरण का निर्देशन ।
प्रश्नोत्तरि में अमूल्य भाषण । भजन नाम में तुमहि नामी ।।२।।
दिव्यभजनप्रेमी, जयजय दिव्यभजनप्रेमी...

मायाभ्रम का भेद बताया । ज्ञान, गुरु का भान दिलाया ।
हरिसुमिरन में भाव जगाया । दीन शरण, चरणों के प्रेमी ।।३।।
दिव्यभजनप्रेमी, जयजय दिव्यभजनप्रेमी...

५९. चंद्राची आरती

ओवाळू चंद्रमा नभमय शीतल सुखप्रेमा ।
भगवंताची तूच विभूती, जग जन मन धामा ।।धृ।।

तू आकाशी कलेकलेने ।
स्नेह जागविशी सहजपणाने ।
शुद्धपक्षव्रत धरणाऱ्यांना नित होशी पूर्णिमा ।।१।।

कृष्णपक्षिही वाटीशि मार्दव ।
अवसेला सूर्यापण वैभव ।
रिक्त होउनी दाविशि दीना त्यागाची सीमा ।।२।।

---

६०. श्री तुकामाईंची आरती

ओवाळू, जय जय तुकामाई ।। धृ ।।

अंशावतार दत्तांचे ।
प्रेम विठ्ठलभक्तीचे ।
शिष्य चिन्मयानंदांचे ।
झाली साकार पुण्याई ।।१।।

अवडंबरावरी प्रहार ।
पारखती लहानथोर ।
जीव शरणांगतावर ।
गरीबाची भाकर खाई ।।२।।

ब्रह्मचैतन्य शिष्य थोर ।
पूर्ण कृपा तयांवर ।
दिला नामाचा अधिकार ।
दीनभक्तां ठेवी पायी ।।३।।

६१.श्री वासुदेव कृष्णाची आरती

वासुदेव हे जय श्रीकृष्णा । ओवाळू भावे ।
आरती, ओवाळू भावे ।।
हे परमात्मन् तुमचे दर्शन जळीस्थळी व्हावे ।।धृ।।

जन्मोजन्मी शिणलो देवा ।
उद्धाराचा मार्ग न ठावा ।
भवगोवर्धन अमुचा देवा ।
तुम्हीच पेलावा ।
लीलया, तुम्हीच पेलावा ।।१।।

द्या देवा तव अपूर्व शांती ।
रणी, वनी वा एकच वृत्ती ।
स्मरण राहु दे अमुच्या चित्ती ।
इतुके द्या देवा ।
दीना, इतुके द्या देवा ।।२।।

६२. श्री टेंब्येस्वामींची आरती

वन्दे टेंब्येस्वामिगुरुं श्री परमहंसदत्तं ।
परिव्राजकं आचार्यं प्रणतोऽस्मि वासुदेवं ।।धृ।।

ज्योतिषशास्त्रे पूर्णाभ्यासः ब्रह्माचरणं कृतं ।
वेदशास्त्रवेदाङ्गे प्राप्तं अपूर्व नैपुण्यं ।।१।।

सगुणपूजनं वेदाभ्यासः स्वीकृत गार्हस्थ्यं ।
घोर संसृतिं दूरी कृत्वा निर्वेद प्राप्तं ।।२।।

सप्तशतिं वा करुणात्रिपदिं दिव्यलेखनं कृतं ।
जड जीवानां दुःखनिवृत्तेर् विविध मंत्र दत्तं ।।३।।

पादाक्रान्तं भारतवर्षं संस्थापय धर्मं ।
चातुर्मास्ये स्थाने स्थाने कृतं भक्तिवर्धनं ।।४।।

समाधिस्थिते नर्मदातटे गरुडेश्वरवासिनं ।
पालय हे करुणालय स्वामिन् दीनभक्तवृन्दं ।।५।।

६३. श्री योगी अरविंदांची आरती

आरति अरविंदा, योगीऽ ।।धृ।।

दिव्यतेतुनी विश्व जन्मते ।
जडचेतन वा असो कसे ते ।
शरीर, मन वा सृष्टिरूप ते ।
गाठू दे दिव्यता ते सदा ।।१।। आरति अरविंदा...

अहंकार हे असे बालपण ।
विश्वात्मकता हेच थोरपण ।
दीना, जडता हे अवरोहण ।
आरोहण हो ध्येय सर्वदा ।।२।। आरति अरविंदा...

६४. श्री निंबरगी महाराजांची आरती

जय जय जय गुरुलिंगजंगमा, काडसिद्धप्रेमा ।
निंबरगींना ओवाळूया निर्गुणसुखधामा ।।धृ।।

काडसिद्धआज्ञेने छत्तिस वर्षे तप केले ।
हरिहर अनुभव आत्मारामी तादात्म्ये आले ।
कर्मकांड अवडंबर टाकुनि खरे पुण्य केले ।
भ्रमितांना जागवुनी शाश्वत आत्मज्ञान दिले ।।१।।

साधुबुवा, उमदीकर अगणित शिष्य सिद्ध केले ।
गणपतिवदनी 'पंचसमासी' सार तुम्ही दिधले ।
अंबुराव, गुरुदेवांकरवी नाम जगी नेले ।
कितीक दीनजिवांना जन्मोजन्मी सावरिले ।।२।।

६५. श्री रामकृष्ण परमहंस यांची आरती

वन्दे रामकृष्णं, परमहंसम् ।।धृ।।

नमोस्तु भावं, बालकवृत्तिम् ।
नमोस्तु कालीमातापुत्रं, परमं आनंदम् ।।१।। वन्दे...

अतर्क्यमपूर्वं साधननिपुणम् ।
तादात्म्यं, हे गतदेहभानं, लीलाअवतारम् ।।२।। वन्दे...

विश्वाकारं, विश्ववंदितम् ।
प्रसीद ठाकुर, दीनवत्सलं, हे करुणामूर्तिम् ।।३।। वन्दे...

६६.श्री भाऊसाहेब उमदीकर महाराज यांची आरती

जय जय भाऊराया,
ओवाळू, जय जय भाऊराया ।
जय उमदीशा, नेमाधीशा,
जय जय भाऊराया ओवाळू...।। धृ ।।

पुण्याईला फळ येवोनी ।
साधुबुवांचे दर्शन होउनी ।
निंबरगींची कृपा घडोनी ।
नामानुभवे भेदिशि माया ।। जय जय... ।। १।।

निंदा साहुनि जन बोधियला ।
खरा देव दीनांस दाविला ।
आचरणाचा पथ प्रदर्शिला ।
उद्धरण्या जन झिजविशि काया ।। जय जय...।।२।।

६७. श्री विनोबांची आरती

दैवीगुणसंपन्ना ऋषिवर आचार्या ।
देई शक्तीबुद्धी तव ऋण फेडाया ।। धृ ।। जय जय विनोबा...

मानायोग्य असुनी, नावडे मान ।
स्तुतिसी योग्य असुनी, न ऽ घेइ स्तवन ।
पूजास्थानी असुनी, नच घे पूजन ।
तेची स्थान खरे, करण्या गुणगान ।।१।। जय जय विनोबा...

कुशाग्र बुद्धी परिणत प्रज्ञा चारित्र्य ।
कुराणबायबलवेदग्रहण वैचित्र्य ।
भूमीदान समता ध्यास सर्वत्र ।
त्यागी जीवन कळण्या लागे सत्पात्र ।। २ ।। जय जय विनोबा...

प्रवचन वा गीताई, धर्मामृत, सूत्र ।
'सत्यशोधन', 'जय जग' , जगण्याचे मंत्र ।
शिक्षण देते बाबा, तुमचे चरित्र ।
दीना पुरु दे एक, वस्त्र अन् पात्र ।। जय जय विनोबा...

६८. श्री गणोरे बाबांची आरती

प्रेमनिधी श्री संत गणोरे बाबांना आरती ।
जय जय बाबांना आरती ।। धृ ।।

देशकारणी देह झिजविला ।
परकी सत्तेसवे झुंजला ।
'त्यागी' म्हणुनी कीर्ति पावला ।
स्वातंत्र्याचा सूर्य उगवता, देवमार्ग धरिती ।। १ ।। जय जय बाबांना...

सीतामाई पतीपरायण ।
श्रमा, साधना साथ विलक्षण ।
बाबा झाले देवा अर्पण ।
माघ शुद्ध दशमीला तुकया, वरदहस्त ठेविती ।। २ ।। जय जय बाबांना...

ओंकाराचे रहस्य हाती ।
साक्षात्कारी बाबा देती ।
भुकूम मठ प्रेरणा निर्मिती ।
हरीरामविठ्ठल या नामे, दीनजिवां तारिती ।। ३ ।। जय जय बाबांना...

६९. श्री जे. कृष्णमूर्तींची आरती

नमुया, जय जे. कृष्णमूर्ती ।। धृ ।।

योग असंग्रह त्याग विलक्षण । करुनि जाणले समग्र जीवन ।
दुःखाकारण एकचि हे मन । जगकल्याणा तनमन अर्पण ।
दीना दिधलि गती ।। १ ।।

ज्ञानामध्ये स्वरूपज्ञान । शोधामध्ये मानसशोधन ।
प्रश्नांतच ते उत्तरशोधन । वृत्तीपालट हे परिवर्तन ।
तळमळ करि प्रगती ।। २ ।।

नित्य नम्र त्या कळते जीवन । शिक्षण, वय ना कुठले बंधन ।
वृक्ष दगड डोंगरही चेतन । एकसंध आनंदी जीवन ।
'मी' नुरता शांती ।। ३ ।।

७०. श्री स्वामी स्वरूपानंदांची आरती

जय जय आरती स्वरूपानंदा,
सोहम् हंसा आत्मानंदा ।। धृ ।।

देशभक्तिने ओढ लाविली । सामान्यांपरि वाट आखिली ।
नियतीला ती मान्य नसे ही, देवकृपा झाली ।। १ ।।

निमित्त झाली क्षीण प्रकृती । महत्कार्य ते देव योजिती ।
स्वस्थानी अन् आत्मध्यानी, शांतिमूर्ति घडली ।। २ ।।

उपासिता श्री सद्गुरुचरणा । देव प्रकाशित करि आचरणा ।
सोहम् सोहम् ध्यानी ध्याता, येरझार नुरली ।। ३ ।।

देव ठेवितो तसे रहावे । स्वानंदा परि हलू न द्यावे ।
दीनजनांनी श्वासावरती, लक्ष असू द्यावे ।। ४ ।।

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प : स्वरूप व पद्धती
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश
१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली
२१. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही
२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध
२५. दिशा :
२६. उत्तरायण - भाग २
२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी
२९. उपासना :
३०. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी
३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २
३३. साधनपदावली भाग १
३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा
३६. मेरी यात्रा (हिंदी)
३७. बोधपाठ
३८. एकाध्यायी विचारगीता
३९. सृष्टिसंदेश
४०. गुरुतत्त्वतरंगिणी
४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत
४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)
४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)
५५. शिदोरी
५६. विचारविसावा
५७. सारविस्तार भाग २
५८. महाराजांची शाळा
५९. साधनपदावली भाग २
६०. आरतीपुष्पमाला
६१. विनवणीची वाणी
६२. श्रद्धेची पहाट
६३. उपासनामाला

६४. पावनपथ
६५. अनुभवपुष्पे - भाग १
६६. कृतज्ञतामार्ग
६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात
६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी :
(मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)
६९. संतबोध : भाग ४
७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार
७१. उत्तरायण -भाग ३
७२. अनुभवपुष्पे - भाग २
७३. श्रद्धा
७४. अनुभवपुष्पे - भाग ३
७५. अर्घ्य
७६. जीवनचिंतन
७७. स्वास्थ्यसंवाद
७८. वचनांजली भाग १
७९. अक्षरायण
८०. वचनांजली भाग २
८१. भावगीता

***



उपासनेसाठी नित्यपाठ

संतछाया
संतनगरी,सातारा